# उ टू ची गोष्ट

लेखिका : ताराबाई मोडक

प्रथम प्रसिद्धी : शिक्षण पत्रिका (१९३३)

आजकाल आमच्या शाळेत ऊ टू ची गोष्ट खूप चालते आहे. शाळेत गेल्याबरोबर मुले ‘बाई, गोष्ट सांगा ना’ म्हणून पाठीस लागत असतात. व कोणती गोष्ट सांगू म्हणून विचारले की ‘ऊ टू’ ची असा सर्वांचा एक आवाज येतो.

ऊ टू ची गोष्ट घरीही मुलांना फार आवडते. व शाळेतही जर सांगितली तर ती लगेच बालप्रिय होते असे अनुभवास आले. याचे कारण, त्या गोष्टीत बालप्रिय होण्याचे पुष्कळ गुण आहेत.

वाचकांपैकी बहुतेकांस ती माहिती असेलच, पण आजकाल घरी रात्री आजीबाईच्या जवळ बसून गोष्टी ऐकण्याचा प्रघात बंद पडत चालला आहे. कारण घरात बहुदा आजीच नसते, एकटी आईच असते व ती स्वैंपाकात तरी गुंग असते, नाहीतर बाबांबरोबर फिरायला अथवा क्लबमध्ये गेलेली असते किंवा शेजारणी पाजारणींच्याशी गप्पा मारण्यात गुंतलेली असते. शाळांतून असली ग्राम्य गोष्ट बहुतेक सांगत नसतील. त्यामुळे कदाचित गेल्या पंचीवीस वर्षात वाढून मोठ्या झालेल्या आजच्या मातापित्यांपैकी काहींना ही गोष्ट माहीत नसण्याचा संभव आहे म्हणून गोष्ट खाली देत आहे.

## ऊ टू ची गोष्ट

**एक होती ऊ**

**तिला झाली टू.**

**ती गेली जेवायला.**

**तिला मिळाला पैसा.**

**‘आई, आई, पैशाच काय आणू?”**

**‘भाजी’**

**चिरू ‘कशी’?**

**‘चरा चरा’**

**'शिजवू कशी?'**

**'रटा रटा'**

**'खाऊ कशी?'**

**'मटा मटा'**

**'निजू कशी?'**

**'डाव्या कुशी'**

**'पादू कशी?'**

**'ढम् दिशी'**

गोष्टीचा शेवट आला की सर्व मुले एका आवाजात 'ढ ऽ म् दिशी!' असे म्हणतात व जिकडे तिकडे हंशा पिकतो.

थोड्याच वेळात "फिरून सांगा बाई, फिरून सांगा बाई" अशी मागणी होऊ लागते. असे आज आठ दहा दिवस चालले आहे. तरी मुलांना अजून तिचा कंटाळा आला नाही. याचे मला नवल वाटू लागले. व मनात आले की या गोष्टीत अशी जादू तरी काय आहे ?

खरोखरच बालकथा या दृष्टीने ही गोष्टी संपूर्ण आहे. म्हणजे तिच्यात बालकथेत असावयास हवे ते सर्व गुण आहेत.

अगदी लहान मुलास गोष्ट गद्यात असण्यापेक्षा पद्य वजा गद्य म्हणजे इंग्लिशमध्ये त्यांना Rhymes म्हणतात किंवा गुजरातीत त्यांना जोडकणा म्हणतात, त्या तऱ्हेची, अधिक पसंत असते. आपल्या लहान मुलांची खेळण्यातली गाणी अशाच प्रकारची असतात. ऊ टू ची गोष्ट सबंध अशाच प्रकारची आहे. तिला गाणे म्हणता येणार नाही. तरी इतर गोष्टी प्रमाणे ती केवळ गद्य ही नाही. तिच्यात एक प्रकारची तालबध्दता आहे व अनुप्रासही आहेत.

अगदी लहान मुलांच्या गोष्टीत काय किंवा गाण्यात काय अर्थापेक्षा शब्दांचीच गमंत त्यांना जास्त हवी असते. ती इतकी की एकवेळ अर्थ नसला तरी त्यांना चालते. एक होती ऊ व तिला झाली टू. टू म्हणजे काय? काही नाही. तिला मुलगी झाली असे म्हटले तर ते रूक्ष गद्य होईल व गोष्टीतली बरीच मजा निघून जाईल. आपल्या छोट्या रसिक श्रोत्यांस 'एक होती ऊ नि तिला झाली टू' असेच हवे असते.

पुढच्या लहान लहान प्रश्नोत्तरांमध्ये या गोष्टीची खरी गंमत आहे. चिरू कशी? चराचरा! शिजवू कशी? रटा रटा! खाऊ कशी? मटा मटा! वगैरे शब्द ध्वनिसूचक आहेत व असले शब्द बालकांस फार आवडतात. शिवाय या प्रश्नोत्तरांमुळे गोष्टीचा गद्यपणा जाऊन त्यास थोडेसे पद्याचे रूप आले आहे. त्यामुळे मुलांस ते लक्षात राहण्यास सोपे जाते; व पुन्हा पुन्हा म्हणण्यात मजा वाटते. निजू कशी? डाव्या कुशी! पादु कशी? ढम दिशी! हे तर म्हणण्यास मुलांस अधिक गोड वाटते. याप्रमाणे या गोष्टीची रचना व शब्दप्रयोग बालकास प्रिय व योग्य असे आहेत. छोटी छोटी वाक्य; उगीच पाल्हाळ न करता मुद्द्यांशी गाठ; उत्तरांची समर्पकता व योग्य शब्दांची योजना; एकंदर सबंध गोष्टही विनाकारण लांबलचक नसून बेताची असणे, वगैरे सर्व गुण या गोष्टीत असल्यामुळे भाषा व रचना या दोन्ही दृष्टींनी ही गोष्ट उत्कृष्ट ठरते.

आता प्रश्न राहिला अर्थाचा. अर्थाचे दृष्टीने पुष्कळांस ही निरर्थक व ग्राम्य वाटते. यात काही बोध? काही तात्पर्य? भाजी चिरून, शिजवून खाण्यासारखा केवळ प्राकृत व क्षुल्लक विषय; ऊ टू सारखी हलकी पात्रे; व त्यात पादण्यासारख्या ग्राम्य गोष्टी. अर्थात गोष्ट सर्वथैव त्याज्य ठरेल.

आरोप खरे आहेत. या गोष्टी पासून फायदा काय? असे विचारल्यास काय सांगणार? मुलांच्या ज्ञानात हिच्यामुळे काही भर पडली? काही नाही! मुलांस हिच्यापासून काही निती शिक्षण, काही बोध मिळाला? नाही! भाषा शिक्षणास मदत झाली? नाही! ही मग ही गोष्ट केवळ वायफळ आहे ही मुलांना सांगण्यात काही अर्थ नाही, असे कदाचित पंडितांनी म्हटल्यास योग्यच आहे.

परंतु आम्हाला तसे वाटत नाही. ज्ञान अथवा बोध मिळेल तेवढेच सांगावे व तेवढेच ऐकावे अशा केवळ व्यापारी धोरणावर गोष्टी सांगणे आम्हाला पसंत नाही. निव्वळ मनाचा आनंद, मौज, हास्य-विनोद यांनाही जीवनात अवश्य स्थान आहे म्हणून शिक्षणातही असले पाहिजे. किंबहुना गोष्टी ऐकण्यात यांनाच प्रथम स्थान मिळाले पाहिजे. अप्रत्यक्षपणे त्यांच्यातून ज्ञान मिळाले तर मिळो; अथवा न मिळाले तर न मिळो; त्यातून बोध निघो की न निघो; भाषा शिक्षणास लाभ होवो की न होवो. या सर्व गोष्टी गौण समजून बालशिक्षणात गोष्टीस स्थान केवळ एकाच कारणाने द्यावे व ते म्हणजे बालकांचा आनंद, त्यांची मौज. मुलांना गोष्टी का सांगाव्यात? तर त्यांना गोष्टी ऐकणे आवडते, त्यात त्यांना मजा वाटते. त्यात आल्हादजनक अशी तत्वे आहेत म्हणून. एवढ्याच करता आम्ही शाळेतील गोष्टी सांगण्याची पद्धतीही नापसंत करतो. सामान्यतः गोष्टींची पसंती ही फारशी सुंदर नसते. आपल्या शिक्षण शास्त्रास ज्ञान व नितीबोध यांचे इतके वेड लागले आहे की, त्याचेकरिता आपण बालजीवनातील पुष्कळ सुंदर व नाजूक गोष्टींचा होम केला आहे. बालकांपासून त्यांची रसिकता, विनोद, मौज, आनंद

वगैरे सर्व आपण हिरावून घेतले आहे. गोष्टीसारखा विषय अभ्यासक्रमात दाखल करून, गोष्टीच्या परीक्षा घेऊन, त्यांची तात्पर्ये सांगून आपण गोष्टींचा खून मात्र केला आहे.

अलिकडे तात्पर्य थोडीशी कमी झाली असली तरी मुलांकडून गोष्टी सांगवून घेणे वगैरे चालतेच. औषधात कडू गोळ्यांवर साखरेच्या वेष्टनाचे जे स्थान असते ते स्थान अभ्यासात गोष्टींना मिळाले आहे. वाचनपाठ काय की तोंडी सांगावयाच्या गोष्टी काय, ज्ञान व बोध सरळ घेण्यास मुले तोंडं वेडीवाकडी करतात, म्हणून गोष्टीरूपात देण्याचा प्रघात आहे.

खरे म्हटले असता, आपल्या मोठ्यांच्या जीवनात नाटक-सिनेमा, जलसा, चित्रप्रदर्शन वगैरेंचे जसे मनाला आनंद विसावा व रसिक मौज देणाऱ्या गोष्टी म्हणून स्थान आहे, तेच स्थान बाल जीवनात गोष्टींना असावे. हे जर कबूल केले तर ऊ टू ची गोष्ट बालकथा या दृष्टीने उत्तम आहे, असे म्हणता येईल. कारण त्यात बुद्धीस विराम आहे; भाषेची मौज आहे; मनास अल्हाद आहे व ती हास्योत्पादकही आहे. ऊ टू सारखी पात्रे विनोद पोषक आहेत. जेवायला जाणे, पैसा मिळणे, भाजी आणणे वगैरे जीवनातील परिचित गोष्टी असल्यामुळे समजून घेण्यास डोक्यास त्रास द्यावा लागत नाही. त्यामुळे गोष्ट ही गोष्टच राहते अभ्यास बनत नाही. शिवाय भाजी आणून करून खाणे या सारख्या सामान्य घरगुती विषयास इतक्या सुंदर रीतीने गोष्टीत गुंफल्या बद्दल गोष्ट बनविणाऱ्यांविषयी आपल्याला कौतुक वाटल्यावाचून राहत नाही.

अप्रत्यक्षपणे गोष्टींमधून ज्ञान, बोध, भाषा शिक्षण वगैरे मिळतेही. जसे वर्षानुवर्षे ऐकलेल्या प्रवचनांपेक्षा उपदेश आणि पेक्षा एखादेवेळी पाहिलेल्या नाटकाचा अथवा चित्रपटाचा प्रेक्षकांच्या मनावर अधिक परिणाम होतो. वर्षानुवर्षे घेतलेल्या व्याकरण आणि भाषा शिक्षणाने होत नाही. असे सुंदर भाषाशिक्षण पुष्कळदा सुंदर नाटके पाहण्याने अथवा गोष्टी वाचण्याने होते. ज्ञानकोश (एनसायक्लोपिडीया) पाठ केला असता मिळणार नाही, इतकी इतिहास भूगोल विज्ञान वगैरे अनेक प्रकारची माहिती व ज्ञान लोकांना आज सिनेमाद्वारा मिळत आहे. त्याप्रमाणे गोष्टींद्वारा बालकांस या सर्व प्रकारचे फायदे होतीलही. पण म्हणून ते ध्येय ठरवून गोष्टींना शर्करावेष्टित ज्ञान व बोध यांची गोळी बनविता कामा नये. ती एक कलाकृतीच राहिली पाहिजे. एक साहित्यकृती याच दृष्टीने तिची पसंती झाली पाहिजे. व एखादा उत्कृष्ट नट असा अभिनय आवाज व कृती यांनी भाषेमध्ये असलेला अर्थ पूर्णपणे बाहेर आणून श्रोत्यांच्या मनावर बिंबवित असतो. तसेच कथाकारांनी योग्य हावभावासहित गोष्ट सांगितली की, तेथे त्याचे काम संपले. त्यानंतर ती गोष्ट मुलांकडून सांगून घेणे, न आल्यास त्यांना प्रश्नांनी टोचून टोचून ती बाहेर काढणे, वगैरे अत्यंत हास्यास्पद प्रकार शाळेत होत असतात. ते पाहून मुलांची कीव येते व गोष्टीसारख्या गोष्टीचे असे हाल झालेले पाहून वाईट वाटते. गोष्टी, कथा वगैरे

यांना जर वाणी आली तर त्या खात्रीने एकच आक्रोश करतील की 'save us from these teachers' ‘या शिक्षकापासून आमचा बचाव करा.’ वर्गातील गोष्टींचा तास म्हणजे गोष्टीचा प्राण घेण्याचा त्रास असतो. शिक्षकांच्या हातात ती गोष्ट नुसती तडफडत असते व ऐकणाऱ्यांची स्थितीही तितकीच करूण असते.

हे असले दृश्य पाहिले म्हणजे असे वाटते की, आपल्या हातात सत्ता असावी व या सर्व प्राथमिक शाळेच्या शिक्षकांस व विशेषतः त्यांना गोष्टी कशा सांगाव्यात हे शिकविणाऱ्यांस एक वर्षपर्यंत रोज नाटक सिनेमास पाठवावे व रोज ती पाहिल्याबरोबर काय पाहिले ते व त्यामधील भाषणे म्हणून दाखविण्यास सांगावे व पहिल्या एक-दोन वेळा मदत करून तीनदा, फार झाले तर चारदा ऐकले की सर्व बरोबर आलेच पाहिजे, असा नियम ठेवावा व वर्षा अंती त्यांची परीक्षा घेतली जावी. ती नुसती म्हणून दाखवण्याची नाही तर अभिनय करून दाखवला पाहिजे व विशेषतः त्यापासून काय बोध घेतला ते त्यांनी सांगितले पाहिजे. म्हणजे वर्षाचे अंती ते सर्व नाटक सिनेमास करमणुकीचे, विश्रामाचे, कलात्मकवृत्ती जोपासण्याचे स्थान मानीनासे होतील. नाटकद्वेष्टे होतील व कदाचित मुलांकडून गोष्टी म्हणून घेण्याचे बंद करतील.

शाळेत जर गोष्टी नीट रीतीने सांगितल्या तर चांगल्या फिल्म्स् जशा आठवडेच्या आठवडे चालतात व जितके जास्त आठवडे फिल्म चालली तितकी अधिक चांगली समजली जाते. तशीच गोष्ट ही आठवडेच्या आठवडे चालत राहील. एखादी गोष्ट फार आवडली म्हणजे मुले ती पुन्हा पुन्हा ऐकण्याची इच्छा दाखवितात व शिक्षकाने ती पुन्हा पुन्हा सांगितली म्हणजे संतुष्ट होऊन त्या गोष्टीतील वाक्य आपल्याशीच म्हणत म्हणत उठून जातात व वातावरणात गोष्टीतील गंमत व मौज दुमदुमत असते.

शेवटी सर्व गोष्टी पटल्याच कदाचित, तरी ऊ टू च्या गोष्टी सारख्या गोष्टीतील ग्राम्य विनोद पुष्कळांच्या कानाला कटू लागणार व शाळेच्या वातावरणात तर तो अगदीच अक्षम्य वाटणार.